## नियमित दरखास्त क्र. १७/२०१२ मधील निशाण ६९ वरील आदेश

०१. सदरील अर्ज सामनेवाला नं. १क व १ड यांनी त्याचेविरुध्द झालेला 'म्हणणे नाही' चा आदेश रद्द करुन त्यांचे म्हणणे दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे. सामनेवाला क्र. १क व १ड यांचे असे म्हणणे आहे की त्यांनी म्हणणे न दाखल केल्यामुळे त्यांच्याविरुध्द 'म्हणणे नाही' असा आदेश झालेला आहे. दरखास्तदार तर्फे दाखल करण्यात आलेला नि. ६६ चा कब्जा वॉरंट काढणेच्या अर्ज प्रस्तुत सामनेवालांवर अतिशय अन्यायकारक आहे. त्यामुळे त्या अर्जावर सामनेवालांचे म्हणणे सादर केले जाणे अत्यंत आवश्यक आहे. सदरचे म्हणणे दाखल करण्याची संधी प्रस्तुत सामनेवाला यांस न दिल्यास सामनेवाला यांचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणार असे अपरिमित नुकसान होणारे आहे. दरखास्तदार यांनी दिनांक ०५/०२/२०१६ रोजी नि. ६६ चा अर्ज दिलेला असून त्याच दिवशी म्हणजे दिनांक ०५/०२/२०१६ रोजी सामनेवाला याचे विरुध्द 'विना म्हणणे' आदेश झालेला आहे. त्यामुळे सामनेवाला यांस म्हणणे देण्याकरिता पुरेशी संधी मिळालेली नाही. दरखास्तदारतर्फे दाखल केलेल्या नि. ६६ च्या अर्जाची प्रत सामनेवाला यास दिली नाही व तशी प्रत प्राप्त झाली असा कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे सामनेवाला यांस म्हणणे देण्याची संधी प्राप्त होणे हे अत्यंत निकडीचे व गरजेचे झालेले आहे. सामनेवाला याने अशी विनंती केली आहे की, त्यांच्याविरुध्द झालेला 'विना म्हणणे' चा आदेश रद्द करण्यात यावा.

०२. सदरील अर्जास दरखास्तदार याने हरकत घेतली आहे व त्यांचे असे कथन आहे की सदरचा अर्ज हा खोडसाळ असून केवळ वेळ काढयासाठी दाखल केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्याचे असे कथन आहे की, मुळ दाव्यातील हुकुमनाम्याप्रमाणे झालेल्या अंतिम निवाडयाची अंमलबजावणी होणेसाठी सदरची दरखास्त दाखल केलेली आहे. त्याप्रमाणे दरखास्तदार हीस दावा घरातील वाटपाचा स्वतंत्र कब्जा मिळणे आवश्यक आहे. दरखास्तदार हिचे सध्याचे वय सु. ८८ वर्षाचे आहे. तिच्या हयातील दावा घराचे वाटप होणे गरजेचे असताना सामनेवाले यांचेकडून आजपर्यंत केवळ वेळकाढूपणाचे धोरण अवलंबले गेले आहे. सामनेवाला यांस म्हणणे देण्याची संधी उपलब्ध असताना अगदी सुरुवातीपासून ते आजपर्यंतच्या अर्ज देईपर्यंत टाळाटाळच केलेली आहे. दावाघरातील वाटपाने मिळालेल्या भागाचा कब्जा दरखास्तदार हिस दिला गेल्यास सामनेवाला याचे काहीही नुकसान होणारे नाही. अशी वस्तुस्थिती असताना सामनेवाला हे दृष्ट बुध्दीने दरखास्तदार हीस वाटप मिळू नये या एकाच हेतून सदरकामी निरनिराळे अर्ज दाखल करित आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३.   प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन करता ही गोष्ट स्पष्ट आहे की  दरखास्तदार यांनी दाखल केलेल्या नि. ६६ वरील अर्जावर त्याचदवशी  'म्हणणे नाही' असा हुकुम माझे पूर्वाधिका—यांनी दिनांक  ०५/०२/२०१६ रोजी केला आहे.  दराखास्तदार यांनी सामनेवाला नं. १अ ते १फ याच्याकडून घराचा कब्जा मागितलेला आहे.  सामनेवाला नं. १क  व १ड यांच्या विरुध्दही ती दाद आहे त्यामुळे त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे.  सदर न्यायालय हे अन्विक्षा न्यायालय असल्यामुळे पक्षकारांना त्यांच्या खटल्या संदर्भात आवश्यक असलेल्या गोष्टी करण्यापासून वंचीत ठेवता येणार नाही.  तसे केल्यास त्यांच्यावर अन्याय केल्यासारखा होणार आहे व ते न्यायोचित ठरणार आहे. नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीकोनातून देखील एखादया पक्षकारास त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे  तशी संधी सामनेवाला न. १क व १ड यांना दिल्यास दरखास्तदार यांचे काहीही नुकसान होणारे नाही. उलट त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील वाद एकाच प्रकरणात निकाली होण्यासाठी मदत होईल.   सबब पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१.   अर्ज नि.क्र.  ६९ मंजूर करण्यात येतो आणि सामनेवाला नं. १क व १ड यांचे दरखास्तदार यांच्या नि. ६६ वरील अर्जावर म्हणणे दाखल करुन घेणेत येते.

सही/—
(एस.एच.पन्हाळे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण

दिनांक :— २२/०२/२०१७